# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

सिडको भवन, दुसरा मजला, (दक्षिण कक्ष) बेलापूर,नवी मुंबई -४०० ६१४.
दूरध्वनी : २७५७ १६७३, २७५७ ०१६६, २७५७ १६७७.
फॅक्स : २७५७ ०९६९, २७५७ १६६६.


जा.क्र-२०२१/बैठक-१५०/(६२)/आ.४ दिनांक : ८/९/२०२१

**प्रति,**
मा.मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव, ग्राम विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (न.वि.२) नगर विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा) वित्त विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (उर्जा) उद्योग, उर्जा कामगार विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

**विषय** : दिनांक ८ सप्टेंबर, २०२१ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या १५०व्या बैठकीचे इतिवृत्त.

महोदय,

दिनांक ८ सप्टेंबर, २०२१ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या १५०व्या बैठकीचे इतिवृत्त आपल्या माहितीसाठी सोबत सादर करण्यात येत आहे.

आपली विश्वासू,

DSK ८।९।२१

**(दिपाली देशपांडे-सावेडकर)**
**मुख्य प्रशासकीय अधिकारी.**

**प्रत:- माहितीसाठी.**
खाजगी सचिव (मा.मंत्री,पा.पु. व स्व. तथा अध्यक्ष,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई.)
सोबतचे इतिवृत्त मा.मंत्री, पा.पु. स्व. यांचे अवलोकनार्थ सादर करावे, ही विनंती.

खाजगी सचिव (मा.राज्यमंत्री, पा.पु. व स्व. तथा उपाध्यक्ष, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई.)

सोबतचे इतिवृत्त मा.राज्यमंत्री, पा.पु. स्व. यांचे अवलोकनार्थ सादर करावे, ही विनंती.

**प्रत: माहितीसाठी व त्वरित कार्यवाहीसाठी.**

संचालक (वित्त), म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

उप सचिव (पापु-२३), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.

मुख्य अभियंता, म.जी.प्रा. प्रादेशिक विभाग, ठाणे/पुणे/नाशिक/औरंगाबाद /अमरावती/नागपूर.

अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा, म.नि.सं. व सं.कक्ष, मित्तल चेंबर्स, मुंबई.

अधीक्षक अभियंता (मुख्यालय), म.जी.प्रा., मुंबई.

उप मुख्य लेखाधिकारी (१ २) म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

आस्थापना अधिकारी (दक्षता), म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

उप अभियंता तथा मालमत्ता व्यवस्थापन (कक्ष - ९) म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

कायदा व कामगार अधिकारी, म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

उप अभियंता (आय.टी.सेल), मित्तल चेंबर्स, मुंबई.

प्रशासकीय नि आस्थापना अधिकारी, म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

सर्व कक्ष अधिकारी / कार्यासन अधिकारी (आस्थापना - ) म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

सोबतचे इतिवृत्तातील आपल्या कार्यालयाशी संबंधीत कार्यक्रम बाबींवर त्वरित योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा कार्यपुर्ती अहवाल १० दिवसांत मध्यवर्ती कार्यालयास सादर करावा.

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १५०व्या बैठकीचे इतिवृत्त.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची १५०वी बैठक मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष, मा.श्री.गुलाबराव पाटील यांचे अध्यक्षतेखाली मा.मंत्री, महोदय यांचे दालनात बुधवार दिनांक ८ सप्टेंबर, २०२१ रोजी दुपारी १२.३० वाजता संपन्न झाली. या बैठकीस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाचे खालील सदस्य उपस्थित होते.

१) मा.श्री.गुलाबराव पाटील, मंत्री, पा.पु. व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष.

२) मा.श्री.संजय बनसोडे, राज्यमंत्री, पा.पु.व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष.

३) श्री.संजय चहांदे, अपर मुख्य सचिव, पा.पु.व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई

४) श्री.किशोर राजे निंबाळकर, सदस्य सचिव, म.जी.प्रा. तथा प्राधिकरणाचे सदस्य सचिव, मुंबई.

या व्यतिरिक्त सदर बैठकीस खालील अधिकारी उपस्थित होते.

१) श्रीमती दिपाली देशपांडे-सावेडकर, मुख्य प्रशासकीय अधिकारी, म.जी.प्रा. मुंबई.

२) श्रीमती मृदुल सांभारे, संचालक (वित्त) (प्रभारी) , म.जी.प्रा., सिडको भवन, नवी मुंबई.

३) श्री. प्रशांत भामरे, अधीक्षक अभियंता (मु.), म.जी.प्रा.मुंबई.

सर्व प्रथम मा.सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर मा.मंत्री, पा.पु. व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष, यांच्या परवानगीने बैठकीस सुरुवात करण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.:- १ :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या च्या १४९व्या बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता देणे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची १४९वी बैठक दिनांक १६ जून, २०२१ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता प्रदान करण्याचा प्रस्ताव संचालक मंडळास सादर करण्यात आला व त्यास मान्यता प्रदान करण्याची विनंती सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी संचालक मंडळास केली.

इतिवृत्तावर चर्चा होऊन, १४९व्या बैठकीच्या इतिवृत्तास संचालक मंडळाने मान्यता दिली.

किशोरराजे निंबाळकर

अध्यक्ष तथा<br>मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,<br>म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र. २:-** म.जी.प्रा.च्या १४९व्या बैठकीपुढील बाबींवर करण्यात आलेल्या कृतीस मान्यता देणे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची दिनांक १६ जून, २०२१ रोजी संपन्न झालेल्या १४९व्या बैठकीमध्ये जे निर्णय घेण्यात आले, त्या निर्णयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केलेल्या कार्यवाहीबाबत सदस्य सचिव, यांनी संचालक मंडळास अवगत केले. त्यानुसार १४९व्या बैठकीपुढील बाबींवर करण्यात आलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.३ :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निविदा समितीने घेतलेल्या निविदा स्वीकृतीच्या/अस्वीकृतीच्या निर्णयावर शिक्कामोर्तब करणेबाबत.

मजीप्राच्या निविदा समितीच्या १३० ते १३५ व्या बैठकींमध्ये निविदा स्वीकृती/अस्वीकृतीच्या घेतलेल्या निर्णयांवर मा.संचालक मंडळाने शिक्कामोर्तब करण्याविषयीच्या कार्यक्रम बाबीवर संचालक मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली व पुढीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव** :- मजीप्राच्या निविदा समितीच्या १३० ते १३५ व्या बैठकींमध्ये निविदा स्वीकृती/अस्वीकृतीच्या घेतलेल्या निर्णयाना मा.संचालक मंडळाने मान्यता दिली. या बाबत पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, मजीप्रा यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.४ :-** अमरावती महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रादेशिक विभागाच्या अधिपत्याखालील म.जी.प्रा.विभाग, अकोला कार्यालयाचे इमारतीस कलरींग, केंद्रीय भांडार येथील आवारभिंत, गेट बांधकाम, वर्ग १ व २ निवासस्थानातील बगीचा, विश्रामगृहाची दररोज साफसफाई करणे, अकोट येथे उपविभागीय कार्यालयाचे दुरुस्ती व पेव्हर ब्लॉक बसविणे, तसेच पातूर पा.पु.योजना अंतर्गत पाण्याची टाकी व जलशुध्दीकरण केंद्राचे आवार भिंत बांधणेबाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधीकरणाच्या संचालक मंडळाची १५० बैठक दिनांक ८ सप्टेंबर २०२१ रोजी संपन्न झाली.सदर बैठकीत अमरावती महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रादेशिक

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

विभागाच्या अधिपत्याखालील म.जी.प्रा विभाग, अकोला कार्यालयाचे इमारतीस कलरींग , केंद्रिय भांडार येथील आवारभिंत, गेट बांधकाम, वर्ग १ व २ निवास्थानातील बगीचा विश्रामगृहाची दररोज साफ सफाई करणे, अकोट येथे उपविभागीय कार्यालयाचे दुरुस्ती व पेव्हर ब्लॉक बसविणे, तसेच पातुर पापुयो अंतर्गत पाण्याची टाकी व जलशुध्दीकरण केंद्राचे आवार भिंत बांधणे कामासाठी अंदाजपत्रकीय तरतुद ९३.६० लक्ष मंजुर केली आहे. सदर तरतुद ही अपुरी पडत असुन अकोला विभागास "इमारत व देखभाल दुरुस्ती" या लेखाशिर्षा अंतर्गत रु.११५.५४ लक्ष इतके खर्चाची अंदाजपत्रकीय तरतुदीची आवश्यकता आहे. महाराष्ट्र जीवन प्राधीकरणाच्या स्वनिधीतुन खर्च करण्यास मान्यता देण्याच्या विषयाच्या प्रस्तावास मा. संचालक मंडळाच्या बैठकीत चर्चा करुन कार्यक्रम बाब क्रमांक ०४ अन्वये मान्यता प्रदान केली. खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यात आला आहे.

**ठराव** :-

असा ठराव करण्यात येतो की,

अमरावती प्रादेशिक विभागाअंतर्गत अकोला विभांगातर्गत कार्यालयीन इमारतीचे देखभाल व दुरुस्ती अंतर्गत वरीलप्रमाणे कामासाठीचा रु.११५.५४ लक्ष इतका खर्चाची तरतूद महाराष्ट्र जीवन प्राधीकरणाच्या स्वनिधीतुन करण्यास मान्यता देण्या विषयीच्या प्रस्तावास याबाबतीत सविस्तर अंदाज व आराखडे तयार करुन त्यास अधिक्षक अभियंता, मजीप्रा मंडळ, अकोला यांची तांत्रिक मंजुरी देवुन आवश्यकनुसार, निविदा/ ई- निविदा प्रकिया नुसार सदर कामाची अंबलबजावणी करण्यास संचालक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे

याबाबत पुढील कार्यवाहीसाठी मा.सदस्य सचिव, मजीप्रा यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.५ :-** नागरी पाणी पुरवठा योजनांसाठी आयुर्विमा महामंडळाकडून घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीस स्थगितीस संचालक मंडळाची मान्यता घेणेबाबत.

दिनांक २६/८/२०२१ च्या पत्रान्वये, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी कळविल्याप्रमाणे या विषयाच्या संदर्भाने दिनांक १३/८/२०२१ च्या मा.अपर मुख्य सचिव (वित्त) यांचे अध्यक्षतेखालील झालेल्या बैठकीमध्ये सदर कर्जास शासनाची हमी असल्याने कर्जाच्या

अध्यक्ष तथा
मंत्री पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

थकबाकीची परतफेड करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने पाणी पुरवठा व स्वच्छता व नगरविकास विभागामार्फत संपूर्ण थकबाकीच्या रक्कमांची मागणी वित्त विभागाकडे पुरवणी मागणीद्वारे करण्याबाबत अपर मुख्य सचिव (वित्त) यांनी निर्देश दिले आहेत. त्यासंदर्भाने योग्य ती कार्यवाही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यात यावी, असे संचालक मंडळाने निर्देश दिले आहेत.

**कार्यक्रम बाब क्र.६ :-** जल जीवन मिशनची राज्यात प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत व योजना कालावधीत कामे पूर्ण करण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने वाढीव परिमाण व अतिरिक्त बाब मंजूरीच्या अधिकारात वाढ करण्याच्या प्रस्तावास मा.संचालक मंडळाची मान्यता घेणेबाबत.

जल जीवन मिशनची राज्यात प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत व योजना कालावधीत कामे पूर्ण करण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने योजनेची अंमलबजावणी करताना कामाच्या निकडीनुसार योजनेच्या निविदेंतर्गत उद्भवणाऱ्या वाढीव परिमाण व अतिरिक्त बाब प्रस्तावांच्या मंजूरीच्या अधिकारामध्ये वाढ करण्याबाबत सादर करण्यात आलेल्या प्रस्तावाबाबत मा.संचालक मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा होऊन त्याबाबत पुढीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव :** जल जीवन मिशनची राज्यात प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत व योजना कालावधीत कामे पूर्ण करण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने योजनेची अंमलबजावणी करताना कामाच्या निकडीनुसार योजनेच्या निविदेंतर्गत उद्भवणाऱ्या वाढीव परिमाण व अतिरिक्त बाब प्रस्तावांच्या मंजूरीच्या अधिकारामध्ये वाढ करण्याबाबत पुढील अटी व शर्तींच्या अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१) योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करतानाच योजनेमधील सर्व बाबींची अचुक तरतूद ठेवण्यात यावी. शक्यतो निविदेत वाढीव परिमाणे किंवा अतिरिक्त बाब उद्भवणार नाही याची योजना तयार करताना दक्षता घ्यावी.

२) कलम-३८ तसेच अतिरिक्त बाब प्रस्तावांची एकूण किंमत स्वीकृत निविदा किंमतीच्या १० टक्के पेक्षा जास्त होणार नाही याची दक्षता घ्यावी.

३) आता कलम-३८ तसेच अतिरिक्त बाब प्रस्तावाच्या सुधारित वाढीव अधिकार पुढीलप्रमाणे राहतील.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

## अ) निविदा कलम-३८ अंतर्गत वाढीव परिमाणाचा प्रस्ताव :-

| सक्षम अधिकारी | मजीप्रा परिपत्रक क्र.८३ दि.१२.८.२००२ नुसार, निर्गमित केल्यानुसारचा सध्याचे वाढीव परिमाणांना मंजूरीचे अधिकार. | प्रस्तावित अधिकार | शेरा |
|---|---|---|---|
| कार्यकारी अभियंता | काही नाही. | प्रत्येक निविदेसाठी रु.१० लक्ष पर्यंत. | १) वाढीव परिमाणांच्या प्रस्तावाच्या मंजूरीमुळे योजनेच्या किंमतीत वाढ होणार नाही, या अटीच्या अधिन राहून सदर मंजूरीचा अधिकार लागू राहील.<br>२) वाढीव परिमाणांच्या प्रस्तावाच्या मंजूरीमुळे योजनेच्या किंमतीत वाढ होत असल्यास कलम-३८ नुसारच्या वाढीव परिमाण प्रस्तावास मंजूरी देता येणार नाही. योजनेवरील खर्चाचा सविस्तर आढावा घेऊन सुधारित योजना शासनास सादर करुन शासनाच्या सुधारित प्रशासकीय मंजूरीनंतर प्रस्तावास मान्यता देणे बंधनकारक राहील.<br>३) अमृत अभियानांतर्गत योजना, नगरोत्थान योजना इत्यादि नागरी योजनांसाठी वाढीव परिमाणांच्या प्रस्तावाच्या मंजूरीमुळे योजनेच्या किंमतीत वाढ होत असल्यास शासनाच्या मान्यतेनंतर सदर अधिकारानुसार मंजूरीची कार्यवाही करणे बंधनकारक राहील.<br>४) अमृत अभियानांतर्गत योजना, नगरोत्थान योजना इत्यादि नागरी योजनांसाठी सदर प्रस्तावामुळे मोठ्या प्रमाणात तांत्रिक बदल संभवत नसल्याची खात्री करुन घेणे आवश्यक आहे. तांत्रिक बदल झाल्यास त्यास कलम-३८ च्या प्रस्तावासह शासनाची मान्यता घेणे बंधनकारक राहील.<br>५) अमृत अभियानांतर्गत योजना, नगरोत्थान योजना इत्यादि नागरी योजनांसाठी मजीप्रा स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी पीएमसी म्हणून काम करीत असलेल्या योजनासाठी कलम-३८ चा प्रस्ताव तपासून तांत्रिक सहमती देऊन संबंधीत स्था.स्व. संस्थेने सर्वसाधारण सभेच्या बैठकीत ठेवून त्यास मान्यता प्राप्त करुन घेणे क्रमप्राप्त राहील. |
| अधीक्षक अभियंता | प्रत्येक कंत्राटासाठी / निविदेसाठी रु.१० लक्ष पर्यंत. | प्रत्येक निविदेसाठी रु.२० लक्ष पर्यंत. | |
| मुख्य अभियंता | प्रत्येक कंत्राटासाठी / निविदेसाठी रु.३० लक्ष पर्यंत. | प्रत्येक निविदेसाठी रु.५० लक्ष पर्यंत. | |
| सदस्य सचिव | प्रत्येक कंत्राटासाठी / निविदेसाठी रु.३० लक्ष पेक्षा जास्त किंमतीवरील प्रस्ताव. | प्रत्येक निविदेसाठी रु.५० लक्ष पेक्षा जास्त किंमतीवरील प्रस्ताव. | |

अध्यक्ष तथा

सदस्य सचिव,

**ब) अतिरिक्त बाब दरसूची अंतर्गत प्रस्ताव :-**

| सक्षम अधिकारी | मजीप्रा परिपत्रक क्र.८० दि.१.८.२००२ नुसार, निर्गमित केल्यानुसारचा सध्याचे अतिरिक्त बाब दरसूची मंजूरीचे अधिकार. | प्रस्तावित अधिकार | शेरा |
|---|---|---|---|
| कार्यकारी अभियंता | प्रत्येक अतिरिक्त बाबीसाठी रु.२५,०००/- पण सर्व अतिरिक्त बाबींवरील एकूण मंजूरीची मर्यादा रु.१० लक्ष पर्यंत. | प्रत्येक अतिरिक्त बाबीसाठी रु.५०,०००/- पण सर्व अतिरिक्त बाबींवरील एकूण मंजूरीची मर्यादा रु.१५ लक्ष पर्यंत. | १) अतिरिक्त बाब प्रस्तावाच्या मंजूरीमुळे योजनेच्या किंमतीत वाढ होणार नाही, या अटीच्या अधिन राहून सदर मंजूरीचा अधिकार लागू राहील.<br><br>२) अतिरिक्त बाब प्रस्तावाच्या मंजूरीमुळे योजनेच्या किंमतीत वाढ होत असल्यास अतिरिक्त बाब परिमाण प्रस्तावास मंजूरी देता येणार नाही. योजनेवरील खर्चाचा सविस्तर आढावा घेऊन सुधारित योजना शासनास सादर करुन शासनाच्या सुधारित प्रशासकीय मंजूरीनंतर प्रस्तावास मान्यता देणे बंधनकारक राहील.<br><br>३) अमृत अभियानांतर्गत योजना, नगरोत्थान योजना इत्यादि नागरी योजनांसाठी अतिरिक्त बाब प्रस्तावाच्या मंजूरीमुळे योजनेच्या किंमतीत वाढ होत असल्यास शासनाच्या मान्यतेनंतर सदर अधिकारानुसार मंजूरीची कार्यवाही करणे बंधनकारक राहील.<br><br>४) अमृत अभियानांतर्गत योजना, नगरोत्थान योजना इत्यादि नागरी योजनांसाठी सदर प्रस्तावामुळे मोठ्या प्रमाणात तांत्रिक बदल संभवत नसल्याची खात्री करुन घेणे आवश्यक आहे. तांत्रिक बदल झाल्यास त्यास अतिरिक्त बाब प्रस्तावासह शासनाची मान्यता घेणे बंधनकारक राहील.<br><br>५) अमृत अभियानांतर्गत योजना, नगरोत्थान योजना इत्यादि नागरी योजनांसाठी मजीप्रा स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी पीएमसी म्हणून काम करीत असलेल्या योजनासाठी अतिरिक्त बाब प्रस्ताव तपासून तांत्रिक सहमती देऊन संबंधीत स्था.स्व. संस्थेने सर्वसाधारण सभेच्या बैठकीत ठेवून त्यास मान्यता प्राप्त करुन घेणे क्रमप्राप्त राहील. |
| अधीक्षक अभियंता | प्रत्येक अतिरिक्त बाबीसाठी रु.१० लक्ष पण सर्व अतिरिक्त बाबींवरील एकूण मंजूरीची मर्यादा रु.५० लक्ष पर्यंत. | प्रत्येक अतिरिक्त बाबीसाठी रु.२० लक्ष पण सर्व अतिरिक्त बाबींवरील एकूण मंजूरीची मर्यादा रु.७५ लक्ष पर्यंत. | |
| मुख्य अभियंता | प्रत्येक अतिरिक्त बाबीसाठी रु.२५ लक्ष पण सर्व अतिरिक्त बाबींवरील एकूण मंजूरीची मर्यादा रु.१०० लक्ष पर्यंत. | प्रत्येक अतिरिक्त बाबीसाठी रु.५० लक्ष पण सर्व अतिरिक्त बाबींवरील एकूण मंजूरीची मर्यादा रु.१५० लक्ष पर्यंत. | |
| सदस्य सचिव | रु.२५ लक्ष पेक्षा जास्त किंमतीवरील प्रस्ताव. | प्रत्येक निविदेसाठी रु.५० लक्ष पेक्षा जास्त किंमतीवरील अतिरिक्त बाब प्रस्ताव. | |

याबाबत परिपत्रकाच्या स्वरुपात सूचना निर्गमित करण्यास सदस्य सचिव, मजीप्रा यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र.७ :-** जल जीवन मिशनची राज्यात प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत व योजना कालावधीत कामे पूर्ण करण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने कंत्राटदारांचे पॅनल तयार करण्याच्या प्रस्तावास मा.संचालक मंडळाची मान्यता घेणेबाबत

सदर बैठकीत केंद्र शासनाच्या प्राप्त निर्देशानुसार जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत सर्व योजनांचे कार्यादेश डिसेंबर-२०२१ अखेरपर्यंत देण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या असल्याने, जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत योजनांच्या प्रचलित नियमानुसार योजना निहाय निविदा मागवून कार्यादेश देण्याऐवजी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील विविध वर्गामध्ये नोंदणीकृत त्याचप्रमाणे राज्यातील इतर खात्यांमधील नोंदणीकृत तसेच राज्याबाहेरील नोंदणीकृत ठेकेदारांचे पॅनल तयार करुन त्यांना निविदा समितीमार्फत कामे वाटप करण्यासंबंधीच्या प्रस्तावाबाबत संचालक मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. याबाबत पुढीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव :**

१) सदर कार्यक्रम बाबीमध्ये अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय यांनी ठेकेदारांचे पॅनल तयार करण्याच्या बाबतीत सहमती दर्शविली व या प्रमाणे कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या, याबाबतचा मजकूर वगळण्यात यावा.

२) या प्रकरणी महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम संहितेमधील याबाबतची तरतूद त्याचप्रमाणे एमआयडीसी, एमएसआरडीसी, सार्व. बांधकाम विभाग, सिडको, एमएमआरडीए, महानगरपालिका इत्यादिंकडील पध्दत त्याचप्रमाणे जल जीवन मिशन कार्यक्रम संपुर्ण देशभर राबविण्यात येत असल्याने, इतर राज्यात याबाबत अशी पध्दत राबविण्यात आली आहे का याचा अभ्यास करुन प्रस्ताव पुढील मा. संचालक मंडळाच्या बैठकीसमोर सादर करण्यात यावा.

या प्रकरणी पुढील कार्यवाही करण्यासाठी सदस्य सचिव, मजीप्रा यांना प्राधिकृत करण्यात आले.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र. ८:-** औरंगाबाद येथे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या जागेमध्ये प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करणे- सुधारीत अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या १४३ व्या बैठकीत औरंगाबाद येथे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या जागेमध्ये प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करणेसाठी रु.६८६.६२ किंमतीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येऊन, या कामाचा खर्च प्राधिकरणाच्या स्वनिधीतून करण्यास संचालक मंडळाने मान्यता दिली आहे. या कामाचे कार्यादेश दि.१८.९.२०१९ रोजी देण्यात आले आहेत. या कामांवर आतापर्यंत रु.३२१.८४ लक्ष इतका खर्च झालेला आहे. कामाची प्रगती ६० टक्के झाली आहे.

या योजनेत सोलार प्लँटची तरतूद करणे, विद्युत जोडणीसाठीचा वाढीव खर्च, आरसीसी संकल्पन शुल्कामध्ये वाढ, इ. कामांचा समावेश करुन मुख्य अभियंता, औरंगाबाद यांच्या कार्यालयाने रु.१०.६० कोटी किंमतीचे सुधारित अंदाजपत्रक तयार करुन त्यास पत्र क्र.तांशा-१/१३८० दि.२४.८.२०२१ रोजीच्या पत्रान्वये तांत्रिक मान्यता प्रदान केली आहे. वरील कामांचा विचार करुन योजनेवर रु.३०८.८९ लक्ष इतका जादा खर्च अपेक्षित आहे.

या प्रस्तावाबाबत मा.संचालक मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात येऊन पुढीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव :**

औरंगाबाद येथे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या जागेमध्ये प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करणे संबंधीच्या रु.१०,६०,५०,१००/- इतक्या किंमतीच्या सुधारित योजनेस संचालक मंडळ मान्यता देत आहे. त्याचप्रमाणे या योजनेवरील वाढीव खर्च रु.३७३.८८ लक्ष इतका निधी मजीप्राच्या स्वनिधीतून उपलब्ध करुन देण्यास मा.संचालक मंडळ मान्यता देत आहे.

यावुषयी पुढील कार्यवाही करण्यासाठी सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

किशोरराजे निंबाळकर

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र. ९:-** औरंगाबाद येथे बांधण्यात येत असलेली विश्रामगृहाची इमारत प्राधिकरणाच्या स्वनिधीतून करण्याच्या रु.२९८.८३ लक्ष वाढीव किंमतीसमंजूरी घेण्यासाठी कार्यक्रम बाब तयार करणे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या १४३ व्या बैठकीत औरंगाबाद येथे बांधण्यात येत असलेली विश्रामगृहाची इमारत प्राधिकरणाच्या स्वनिधीतून करण्याच्या रु.२१६.३३ लक्ष किंमतीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येऊन, या कामाचा खर्च प्राधिकरणाच्या स्वनिधीतून करण्यास संचालक मंडळाने मान्यता दिली आहे. या कामाचे कार्यादेश दि.१२.९.२०१९ रोजी देण्यात आले आहे. कामाची भौतिक प्रगती ९५ टक्के इतकी झाली आहे. या कामांवर आतापर्यंत रु.१५०.५१ लक्ष इतका खर्च झालेला आहे.

सदर योजनेत सोलार प्लँटची तरतूद करणे, विद्युत जोडणीसाठीचा खर्च, इमारतीच्या छतावर २ ठिकाणी डोम बसविणे, इ. कामांचा समावेश करुन मुख्य अभियंता, औरंगाबाद यांच्या कार्यालयाने रु.२,९८,८२,७००/- इतक्या किंमतीचे सुधारित अंदाजपत्रक तयार करुन त्यांचे पत्र क्र.तांशा-१/१५२५ दि.३.९.२०२१ रोजीच्या पत्रान्वये तांत्रिक मान्यता प्रदान केली आहे.

सदर सुधारित अंदाजपत्रकास मान्यता देण्याविषयीच्या व सदर वाढीव खर्च रु.८२.५० लक्ष मजीप्राच्या स्वनिधीतून करण्याविषयीच्या प्रस्तावाबाबत मा.संचालक मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली व या प्रकरणी पुढीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव :**

औरंगाबाद येथे बांधण्यात येत असलेली विश्रामगृहाची इमारत प्राधिकरणाच्या स्वनिधीतून करण्यासंबंधीच्या रु.२,९८,८२,७००/- इतक्या किंमतीच्या सुधारित योजनेस मान्यता देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे योजनेवरील वाढीव खर्च रु.८२.५० लक्ष इतका निधी मजीप्राच्या स्वनिधीतून उपलब्ध करुन देण्यास मा.संचालक मंडळ मान्यता देत आहे.

याविषयी पुढील कार्यवाही करण्यासाठी सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र. १०:-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन २०१८-१९ चे वार्षिक लेखा मंजूरीबाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, संचालक मंडळाची १५०बैठक दिनांक ८ सप्टेंबर, २०२१ रोजी संपन्न झाली. या बैठकीत प्राधिकरणाचा सन २०१८-१९ या वर्षाचे लेखे संचालक मंडळाच्या अवलोकनार्थ व मान्यतेसाठी सादर करण्यात आले. वार्षिक लेख्याबाबतची सविस्तर माहिती संचालक मंडळास देण्यात आली. चर्चेअंती सन २०१८-१९ च्या वार्षिक लेख्यास, कार्यक्रम बाब क्र. १० अन्वये संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली. खालीलप्रमाणे ठराव पारित केला.

**ठराव :-**

१) असा ठराव करण्यात येतो की, सन २०१८-१९ या वर्षाचे वार्षिक लेखे स्विकृत करण्यात आले आहेत.

२) असा ही ठराव करण्यात येतो की, सन २०१८-१९ या वर्षाचे वार्षिक लेखे प्राधिकरणाच्या वतीने प्राधिकरणाचे मा.अध्यक्ष व सदस्य सचिव यांनी प्रमाणित करावेत.

३) तसेच असा ही ठराव करण्यात येतो की, स्विकृत लेख्यांमध्ये मांडण्यात आलेल्या कामाच्या निष्कर्षामध्ये ज्यांच्यामुळे कोणताही महत्वाचा फरक पडणार नाही, अशा किरकोळ स्वरुपाच्या दुरुस्त्या प्राधिकरणाच्या मा.संचालक (वित्त) व मा.सदस्य सचिव यांचे स्वाक्षरीने करता येतील.

४) स्वीकृत लेखा व महालेखापाल, नागपूर यांना लेखा परिक्षणासाठी उपलब्ध करुन देणे इत्यादीसाठी मा.सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्रमांक-१ :**

**विषय : श्री किशोर राजे निंबाळकर, सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची सेवा करार पध्दतीने घेणेबाबत.**

श्री किशोर राजे निंबाळकर, सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण या पदावर दि.११.०९.२०२० पासून ते आज पर्यंत कार्यरत आहेत. ते नियत वयोमानानुसार दि.३०.०९.२०२१ रोजी सेवा निवृत्त होत आहेत. त्यांच्या सेवा दि.०१.०१०.२०२१ पासून करार पद्धतीने

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

घेण्याबाबतच्या प्रस्तावावर संचालक मंडळाच्या १५० व्या बैठकीत चर्चा करण्यासाठी मा. अध्यक्ष यांनी सदरील विषय संचालक मंडळासमोर ठेवण्यात येणाऱ्या आयत्या वेळेचा विषय म्हणून चर्चेसाठी घेतला त्यावर बैठकीमध्ये खालील मुद्दयांवर सविस्तर चर्चा झाली.

**१) पार्श्वभूमी :-**

महाराष्ट्र राज्यामध्ये सन **२०१९** पासून जल जीवन मिशन या योजनेची सुरूवात करण्यात आलेली आहे. त्यानुसार जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत राज्यातील सर्व ग्रामीण भागातील कुटुंबांना सन **२०२४** पर्यंत वैयक्तिक नळ जोडणी व्दारे दरडोई प्रति दिन किमान **५५** लिटर गुणवत्तापूर्ण पाणीपुरवठा करण्याचे निश्चित करण्यात आलेले आहे. जल जीवन मिशन अंतर्गत राज्यातील पाणी पुरवठा योजना राबवितांना स्वतंत्र योजनांसाठी **१५** वर्ष व प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांसाठी **३०** वर्ष संकल्पन कालावधी विचारात घेऊन योजनांचे संकल्पन करण्यात येते. स्वतंत्र पाणी पुरवठा योजना व प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांना कार्यारंभ आदेश दिल्यानंतर योजना पुर्ण करण्यासाठी अनुक्रमे जास्तीत जास्त १८ महिने व ३६ महिन्यांचा कालावधी अनुज्ञेय आहे.

**२) जल जीवन मिशन विषयक राज्याची सद्यस्थिती :-**

जल जीवन मिशन अंतर्गत राज्यास १,४२,३६,१३५ इतके नळ जोडणीचे उद्दिष्ट देण्यात आले असून दि. ३१.०८.२०२१ पर्यंत ९३,०६,३४८ इतके उद्दिष्ट साध्य करण्यात आले आहे. त्याची टक्केवारी ६५% इतकी आहे. उर्वरित साध्य ४९,२९,७८७ असून त्यापैकी सन २०२१-२२ चे उद्दिष्ट २७,४५,३४९ आहे व भारतामध्ये महाराष्ट्राचा १२ वा क्रमांक आहे. यापैकी मोठ्या प्रमाणावरील नळ जोडणी ही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यात येत आहे.

**३) कृती आराखडा :-**

सन २०२१-२२ या वर्षा अखेर राज्यामध्ये **४,५१८** नवीन योजना, **२५,३३५** सुधारात्मक पुनर्जोडणी योजना अशा मिळून **२९,८५३** योजना पुर्ण करावयाच्या आहेत. त्याची अंदाजित किंमत रू.**१२,९५०.२८** कोटी इतकी आहे. सन २०२४ पर्यंतच्या योजनांचा विचार करता **१३,३१८** नवीन योजना, **२५,३३५** सुधारात्मक पुनर्जोडणी योजना अशा मिळून **३८,६५३** योजना मार्च- २०२४ पूर्वी पुर्ण करावयाच्या आहेत. त्याची एकूण किंमत **२४,९४९.३५** कोटी इतकी आहे. त्यापैकी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा मार्फत जल जीवन मिशन कृती आराखड्यांतर्गत रु.**५**

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

किशोरराजे निंबाळकर
सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

कोटी वरील किंमतीच्या एकूण **२६१** योजना नव्याने प्रस्तावित करण्यात आल्या असून, सुधारणात्मक पुनर्जोडणी (Retrofitting) अंतर्गत एकूण **१५२** योजना अशा एकूण **४१३** योजना प्रस्तावित करण्यात आलेल्या आहेत. त्याची एकूण अंदाजित किंमत **१२,०००** कोटीपर्यंत आहे. तसेच स्वच्छ भारत अभियान ग्रामीण टप्पा II अंतर्गत ग्रामस्तरीय घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन, तालुकास्तरीय मासिक पाळी व्यवस्थापन व प्लास्टिक कचरा व्यवस्थापन तसेच जिल्हास्तरीय मैला गाळ व्यवस्थापन व गोबरधन तथा अनुषंगिक उपांगांच्या अमंलबजावणीसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण स्तरावर तांत्रिक सहाय्य कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

**४) अर्थसंकल्पित तरतूद :-**

सन **२०२१-२२** केंद्र शासनाच्या दि.**१३.०५.२०२१** रोजीच्या आदेशान्वये राज्याकरीता चालू वित्तिय वर्षाकरीता **रू. ७०६४.४१ कोटी (केंद्र हिस्सा)** नियतव्यय निश्चित केला आहे. त्या अनुषंगाने तेवढाच राज्य शासनाचा हिस्सा एकत्रित करून या योजनेस एकूण **रू. १४,१२८.८२** कोटी उपलब्ध होतील.

**५) विभागासमोरील आव्हाने :-**

**केंद्र शासनाचे दि.१४.०८.२०२१ रोजीच्या निर्देशानुसार सर्व योजनांचे**

अ) सुधारात्मक पुनर्जोडणी करून त्या जल जीवन मिशनची सुसंगत करण्याची अंतिम मुदत दि.३१.०३.२०२२ अशी आहे.

ब) राज्यातील आकांक्षित जिल्ह्यातील कामे प्राधान्याने हाताळून ही कामे पुर्ण करण्याची अंतिम मुदत दि. ३१.०३.२०२२ अशी आहे.

क) नवीन प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांना कार्यारंभ आदेश देण्याकरीता अंतिम मुदत दि.३१.१२.२०२१ अशी आहे.

ड) अर्थसंकल्पित निधीप्रमाणे योजना पुर्ण होऊन भौतिक व आर्थिक प्रगती न झाल्यास व वेळेवर प्रकल्प पुर्ण न झाल्यास आर्थिक दायित्वाची जबाबदारी संपूर्ण राज्यावर येईल व पुढील कामे राज्य शासनाच्या निधीतून करणे क्रमप्राप्त होईल व निधी अभावी कामे अपूर्ण राहण्याची शक्यता नाकारता येत नाही.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**६) नियोजन व प्रकल्प पुर्ण करण्या संदर्भातील नियोजन :-**

जल जीवन मिशन अंतर्गत नवीन प्रस्तावित, सद्य:स्थितीत प्रगती पथावरील, पुर्ण झालेल्या योजनांसाठीचे सुधारात्मक पुनर्जोडणी याबाबतचे प्रकल्प तयार करणेसाठी प्रकल्प सल्लागार नेमणे, सुसाध्यता अहवाल तयार करणे, सर्वेक्षण, डी.पी.आर. तयार करणे, तांत्रिक मान्यता देणे, प्रशासकीय मान्यता देणे, निविदा कार्यवाही सुरू करणे, कार्यारंभ आदेश निर्गमित करणे इत्यादी कामे युध्दपातळीवर करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यासाठी १६ प्रकल्प सल्लागार संस्थांच्या नेमणूका करण्यात आलेल्या आहेत व कामे युध्दपातळीवर सुरू करण्यात आली आहे व त्या दृष्टीने निविदा प्रक्रिया पुर्ण करून, कार्यारंभ आदेश देऊन कामे सुरू करण्याबाबत नियोजन करण्यात आले आहे.

तसेच महाराष्ट्र शासनाने काही महत्वाकांक्षी प्रकल्प वेळेत पुर्ण करण्यासाठी काही भारतीय प्रशासकिय सेवेतील अधिकाऱ्यांच्या सेवा या सेवा करार पध्दतीने घेण्यास विशेष बाब म्हणून मान्यता दिलेली आहे. जसे की,

१) केंद्र सरकारने भारतीय रेल्वेमध्ये श्री. ई. श्रीधरन यांचे वय ७० वर्षाचे असताना त्यांच्या सेवा रेल्वेचे महत्वकांक्षी प्रकल्प पुर्ण करण्यासाठी घेतलेल्या आहेत.

२) श्री. आर. सी. सिन्हा, अपर मुख्य सचिव (निवृत्त) यांची महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक या पदावर पुर्ननियुक्ती केली होती.

३) श्री. राधेश्याम मोपलवार यांना ते दिनांक २८ फेब्रुवारी, २०१८ रोजी सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांना उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विकास महामंडळ मर्या. मुंबई या पदावर करार पध्दतीने दि.४ जून २०२१ ची मुदतवाढ धरून आतापर्यंत त्यांना ३ वेळा मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

४) श्री विजय कुमार गौतम यांना दि.३० एप्रिल २०२१ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्यानंतर जलसंपदा विभागामध्ये त्यांना दि. ७ मे २०२१ रोजी विशेष कार्य अधिकारी, जलसंपदा विभाग या पदावर कंत्राटी तत्वावर नेमणूक देण्यात आली आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**वरील नमूद सर्व बाबींचा विचार करता खालील ठराव पारित करण्यात येत आहे.**

**ठराव :**

श्री.किशोर राजे निंबाळकर हे दि. ३० सप्टेंबर २०२१ रोजी सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण या पदावरून नियत वयोमानानुसार सेवा निवृत्त होत आहेत. जलजीवन मिशन हा केंद्र व राज्य शासनाचा अत्यंत महत्वाकांक्षी प्रकल्प असून तो सन २०२४ पर्यंत पूर्ण करावयाचे मोठे आव्हान असल्याने तसेच श्री.किशोर राजे निबांळकर यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामध्ये रूजू झाल्यापासून सर्व कामे अतिशय जलद गतीने व कालमर्यादेत पुर्ण करुन मोठे योगदान दिलेले असल्याने श्री.किशोर राजे निबांळकर हे नियत वयोमानानुसार दि.३०.०९.२०२१ रोजी सेवानिवृत्त झाल्यावर त्यांच्या सेवा दि.०१ ऑक्टोबर २०२१ पासून तीन वर्षाच्या कालावधीसाठी त्यांच्या सेवा करार पध्दतीने पुढे चालू ठेवण्यास तसेच त्यांच्या सेवा करार पध्दतीने घेण्याबाबतच्या नियुक्तीच्या अटी व शर्ती, त्यांना देय असलेले वेतन व भत्ते (मासिक पारिश्रमिक) तसेच प्रशासकीय वित्तीय अधिकार निश्चित करणे याबाबतची कार्यवाही सामान्य प्रशासन विभागाने वेळोवेळी केलेल्या शासन निर्णयातील तरतूदी नुसार विभागाने करण्यात यावी. व श्री. किशोर राजे निंबाळकर हे भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी असल्याने त्याबाबतच्या प्रस्ताव मान्यतेसाठी मा. मुख्य सचिवांमार्फत मा.मुख्यमंत्र्यांकडे मान्यतेसाठी सादर करण्यास संचालक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु.व स्वच्छता

किशोरराजे निंबाळकर
सदस्य सचिव,
म.जी.प्रा.